# सायबर सुरक्षेसाठी विद्यार्थ्यांचा पुढाकार : क्विक हील फाउंडेशनचे प्रभावी प्रेझेंटेशन

बारामती-विद्या प्रतिष्ठानच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा जनजागृतीसाठी विशेष प्रेझेंटेशन आयोजित करण्यात आले. या उपक्रमात पुण्याहून आलेले वरिष्ठ प्रशिक्षक श्री. धनंजय जाचक यांनी पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत मार्गदर्शन केले. विनोद कुमार गुजर इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थीही यामध्ये सहभागी झाले होते. सायबर क्राईम म्हणजे काय, त्याचे प्रकार, सोशल मिडियावरील फसवणूक टाळण्याचे उपाय, तसेच काही फसवणूक झाल्यास काय करावे, याची सविस्तर माहिती देण्यात आली. या सत्रात २० सायबर वॉरियर्सनी प्रभावी सादरीकरण करून सायबर सजगतेचा संदेश दिला. समन्वयक अक्षय भोसले सर व क्लब ऑफिसर्सनी जाचक सरांचे स्वागत केले. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामुळे महाविद्यालयाने भविष्यात असे कार्यक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा निर्धार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ भरत शिंदे यांनी व्यक्त केला.